महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १३ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १३८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी

## दिल्ली बॉम्ब स्फोटाचे मुंब्रा कनेक्शन ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दिल्ली येथील लालकिल्ला परिसरात झालेल्या बॉंबस्फोटा प्रकरणी एका उर्दू शाळेतील शिक्षकाला एटीएसने मुंब्रा येथून ताब्यात घेतले आहे. अलिकडेच पुण्यातील एका सॉफ्टवेअर अभियंत्याला अल कायदा आणि इतर बंदी घातलेल्या संघटनांशी संबंध असल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. या अभियंत्याकडून मिळालेल्या माहितीवरुन एटीएसने ठाण्यातील एका शिक्षकाच्या आणि पुण्यातील एका दुसन्य व्यक्तीच्या घरांची झाडाझडती घेतली. त्यानंतर मुंब्रा येथील या शिक्षकाला ताब्यात घेण्यात आल्याचे समजते. दरम्यान दिल्लीतील बॉम्बस्फोट प्रकरणाशी या झाडाझडतीचा काही संबंध आहे का याविषयी अजूनही पुरेशा प्रमाणात स्पष्टता आलेली नाही.

दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) स्पष्ट केले की हे झडती सोमवारच्या दिल्लीतील स्फोटाशी जोडलेले नाहीत ज्यामध्ये १२ जणांचा मृत्यू झाला होता, परंतु मानक प्रक्रियेचा भाग म्हणून, ते राष्ट्रीय राजधानीतील घटनेशी महाराष्ट्राचा संबंध आहे का ते तपासत आहे. काही दिवसांपुर्वी पुण्यातून अटक करण्यात आलेल्या अभियंत्याचे नाव झुबेर हंगरगेकर असे आहे. झुबेर एका बैठकीसाठी मध्यंतरी मुंब्रा येथील इंब्राहिम हबीद या शिक्षकाच्या घरी आला होता, अशी माहिती एटीएसच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. तपासादरम्यान, एटीएसला झुबेरच्या जुन्या फोनमध्ये एक पाकिस्तानी संपर्क क्रमांक सापडला. त्यानुसार, एटीएस अधिकाऱ्यांनी मंगळवारी शिक्षकाच्या घरी छापा टाकला. तसेच झुबेरसंबंधी चौकशी केली. त्यानंतर या शिक्षकाला ताब्यात घेण्यात आले, असे सुत्रांनी सांगितले. सायंकाळी उशीरापर्यंत इब्राहीम अटक करण्यात आली नव्हती. 'आम्ही दोन व्यक्तींच्या जागेची झडती घेतली. एक कोंढवा (पुणे येथील परिसर) आणि दुसरा मुंब्रा येथील घरांची तपासणी केली. दोन्ही व्यक्तींची चौकशी केली, असे या अधिकाऱ्याने स्पष्ट केले. दरम्यान या छाप्याचा अजूनही दिल्लीतील स्फोटांशी थेट संबंध आढळून आलेला नाही, असेही या अधिकाऱ्याने सांगितले.




## कंत्राटी कामगारांची संख्या 40 टक्क्यावर

### उल्हासनगर महापालिकेचा कारभार कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या हाती?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** महापालिकेच्या एकूण मंजूर पदा पैकी ४० टक्के पदे कंत्राटी कामगाराची असल्याचे उघड झाले. यामुळे महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे ठाकले असून शासनाने नवीन आकृतीबंद पदाला शासनाने मंजुरी दिल्यास १ हजार पेक्षा जास्त पदाची भरती होणार असल्याचे संकेत आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी दिले.

उल्हासनगर महापालिकेच्या नवीन मंजूर आकृतीबंधानुसार, एकूण ३०४० पदे निश्चित करण्यात आली. आकृतीबंद पदे मंजुरीसाठी शासनाकडे पाठविले असून त्याला मंजुरी मिळताच रिक्त १२८२ पदे भरण्यात येणार असल्याचे संकेत आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी दिली.

महापालिका कारभार चालविण्यासाठी खाजगी ठेकेदाराद्वारे ११०० पेक्षा जास्त विविध पदासाठी कंत्राटी कामगारांची भरली केली असून त्याची टक्केवारी ४० वर गेली. याउलट, महापालिकेच्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांची संख्या आता केवळ १९६० इतकी राहिली आहे. म्हणजेच, महापालिकेचा कारभार आता कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या हाती गेला. नियुक्त केलेले बहुतांश कंत्राटी कामगार स्थानिक नेते, महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्याचे नातेवाईक असल्याने, महापालिका कारभारात गोंधळ निर्माण झाला आहे. महापालिकेत कंत्राटी कामगारांची संख्या ४० टक्क्यावर गेली असून महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक राजकीय नेत्यांचे 'जवळचे' असतील, तर महापालिकेच्या गुप्त आणि संवेदनशील माहितीची सुरक्षितता धोक्यात आली. महापालिकेच्या कार्यक्षमतेवर आणि पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी
# भाजपाचे स्टार प्रचारक जाहीर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

निवडणूक आयोगाकडून राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. जाहीर करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार राज्यात दोन डिसेंबरला नगर पंचायत आणि नगर परिषद निवडणुकीसाठी मतदान होणार आहे, तर तीन डिसेंबरला निवडणुकीची मतमोजणी आहे. दरम्यान या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता राजकीय घडामोडींना वेग आला असून, सर्वच पक्षांनी प्रचाराला जोरदार सुरुवात केली आहे. भाजपकडून आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. ज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक नेत्यांचा समावेश आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपानं आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. ज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे, विनोद तावडे, पीयूष गोयल, नारायण राणे, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, रावसाहेब दानवे, आशिष शेलार, मुलरलीधर मोहोळ, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, गणेश नाईक, जयकुमार रावल, शिवेंद्रराजे भोसले या नेत्यांचा समावेश आहे. दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार राज्यात काही ठिकाणी भाजप ही निवडणूक महायुतीमध्ये लढणार आहे, तर काही ठिकाणी निवडणूक स्वबळावर लढवली जाणार आहे.

सध्याचं राजकीय वतावरण पहाता सर्व पक्षांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे, कारण यानंतर आता लगेच महापालिकांच्या निवडणूका होणार आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये राज्यात महायुतीला मोठं यश मिळालं होतं, त्यानंतर ही पहिलीच निवडणूक असल्यामुळे मतदार कोणाच्या बाजुने कौल देणार हे देखील पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.



## आनंद दिघे साहेबांचा सहवास लाभला; म्हणूनच मी आज खासदार !

### खा. बाळ्यामामांनी दिला आनंद दिघेंच्या आठवणींना उजाळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणेः** स्वर्गीय आनंद दिघे यांचा सहवास मला लाभला म्हणून मी आज खासदारकी पर्यंत पोहोचू शकलो, अशी भावना खासदार सुरेश म्हात्रे (बाळया मामा) यांनी एका मुलाखतीत व्यक्त केली. या मुलाखतीच्या माध्यमातून सुरेश म्हात्रे यांनी धर्मवीर आनंद दिघे आणि त्यांचे संबंध कसे होते हे उलगडले. यात, त्यांनी दिघे यांच्यासोबतच्या काही आठवणींना उजाळा दिला.

वयाच्या १८ वर्षी जेव्हा मी रिक्षा चालवत होतो. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांचे भाषणे ऐकण्याची संधी मला मिळाली. तसेच धर्मवीर आनंद दिघे यांना देखील मी पहिल्यांदा भेटलो. आनंदाश्रमात मी जात असे तेव्हा दिघे यांचे काम पाहायचो. त्यांच्या कामाने मी भारावून गेलो होतो. तेव्हा पासून दिघे यांच्या मला आदर सन्मान वाटू लागला.

दिघे यांच्या प्रेरणेतून खऱ्या अर्थाने तेव्हापासून माझ्या समाजसेवेच्या कामाला सुरुवात झाली. दिघे यांचा सहवास मला लाभला म्हणून मी आज खासदारकी पर्यंत पोहोचू शकलो, असे सुरेश म्हात्रे यांनी या मुलाखतीत सांगितले.

१९९५ साली शाखेची स्थापना झाली तेव्हा मी उपशाखाप्रमुख होतो. उपशाखाप्रमुख ते संपर्कप्रमुख असा माझा प्रवास होता. परंतु, त्यावेळेस दिघे साहेब यांच्यातील जादू म्हणा किमया म्हणा किंवा त्यांना मिळालेला दैवी आशीर्वाद पण, त्यांच्यात जादू होती कितीही मोठा अधिकारी असू द्या किंवा नेता त्यांच्यासमोर दिघे साहेब बसले की त्या विषयावर पटकन तोडगा मिळत असे. ही ताकद फक्त त्यांच्याकडेच होती.

जेवढे ठाण्यातले त्या वेळचे नेते होते त्यापैकी असा कुठलाही नेत्या नाही जो की मला ओळखत नसेल. कारण, आम्ही खूप छोटे कार्यकर्ते होतो तरी देखील दर एक-दोन दिवसांनी साहेबांना भेटायला आनंद आश्रमात जात असे काम असो किंवा नसो साहेबांचा आशीर्वाद घ्यायचो आणि निघायचो, असे काही किस्से सुरेश म्हात्रे यांनी या मुलाखतीत उलगडले.

## "टीकेला कामातून उत्तर द्या" - खा. श्रीकांत शिंदे



### नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदलापुरात शिवसेनेचा मेळावा

" आपण लोकसभा, विधानसभा महायुती म्हणून लढलो. सर्वच निवडणुका महायुतीत लढण्याची गरज आहे. महायुतीचा नगराध्यक्ष झाला पाहिजे अशीच आमची भूमिका आहे, महायुतीत एकमेकांना आव्हान देण्यापेक्षा महायुती कशी मजबूत होईल याकडे महायुतीतील पदाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे, पण टाळी एका हाताने वाजत नाही, त्यामुळे वरिष्ठांचे निर्णय, स्थानिकांचे म्हणणे ऐकूनच युतीचा निर्णय घेतला जाईल,

○ खासदार श्रीकांत शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** विकासाचे राजकारण केले पाहिजे. कोण कुणाला किती शिव्या देते, टीका करते ते महत्वाच नाही. पण कोण काम करत हे जनता पाहते. टीकेला उत्तर देण्यात माणूस गुंतून जातो. त्यामुळे कामावर लक्ष देण्याची गरज आहे, अशा सूचना कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी बदलापुरात केल्या. कुळगाव बदलापूर नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजीत शिवसेनेच्या कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. गेल्या काही दिवसात महायुतीतील भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांमध्ये जोरदार वाकयुद्ध सुरू आहे. त्यावर खासदार शिंदे यांनी यावेळी भूमिका मांडली. कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या निवडणुकांसाठी बुधवारी बदलापूर पश्चिमेतील गौरी सभागृहात शिवसेनेचा मेळावा संपन्न झाला. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे प्रमुख मार्गदर्शन म्हणून उपस्थित होते. गेल्या काही दिवसांपासून बदलापुरात महायुतीत दुफळी माजली असून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिवसेनेच्या विरोधात उभा ठाकला आहे. महायुतीची शक्यता संपुष्टात आली असल्याचे चित्र असताना खासदार शिंदे काय भूमिका घेतात याकडे सर्वाचे लक्ष लागले होते. आमदार किसन कथोरे आणि शिवसेना शहरप्रमुरख वामन म्हात्रे यांच्या मोठा संघर्ष पाहायला मिळतो आहे. त्या पार्श्वभूमीवर शिंदे काय बोलतात याकडेही लक्ष होते. मात्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी टीकेला कामातून उत्तर द्या. टीका करण्यात वेळ घालवू नका, अशा सूचना दिल्या.

## मनोरुग्णालयाकडून खेड्यापाड्यात जनजागृती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे शहर, ता. १२ :** जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त ऑक्टोबर महिन्यात ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या वतीने शहरे आणि ग्रामीण भागात मानसिक आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहचवण्याचे काम केले आहे. यानिमित्ताने व्याख्याने, कार्यशाळा, रॅली, पोस्टर प्रदर्शन, चर्चासत्र आणि नाट्याच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मनाचे आरोग्य, समाजाचे बळ हा संदेश पोहोचवला. जागतिक आरोग्य संघटनेने या वर्षी आपत्ती आणि आपात्कालीन परिस्थितीत मानसिक आरोग्य सेवांची उपलब्धता हे घोषवाक्य दिले होते. या पार्श्वभूमीवर प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या वतीने १० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर दरम्यान विविध जनजागृती कार्यक्रमांच्या माध्यमातून जागतिक मानसिक आरोग्य महिना साजरा करण्यात आला. या अभियानाचे उद्घाटन १० ऑक्टोबर रोजी जिल्हा न्यायाधीश सूर्यकांत शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी सचिव, जिल्हा व विधी सेवा प्राधिकरण सचिव न्या. रविंद्र पाजणकर, उपसंचालक डॉ. निलेश सपकाळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. नेताजी मुळीक यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमात मनोविकार तज्ज्ञ, समाजसेवा अधिकारी, व्यवसायोपचार तज्ज्ञ, परिचारिका आणि डीपीएन महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

# नोंदणी करा; अन्यथा कारवाई

### विनानोंदणी दिव्यांग संस्थांना इशारा ठाणे जिल्हा परिषदेचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. १२ :** जिल्ह्यासह मुंबई विभागातील अनेक दिव्यांग संस्था सरकारकडे नोंदणी न करता कार्यरत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. अशा संस्थांवर कायद्यानुसार कारवाई होणार असल्याची माहिती समाजकल्याण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. अशा संस्थांनी ३० नोव्हेंबरपर्यंत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा ठाणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागप्रमुख उज्ज्वला सपकाळे यांनी दिला आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार कलम ५१ आणि ५२ अंतर्गत दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी सरकारकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. राज्य सरकारने दिव्यांग कल्याण आयुक्तांना सक्षम अधिकारी घोषित केले असून, त्यांच्यामार्फतच नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते.

नोंदणीशिवाय कार्य करणे हे कायद्याचे उल्लंघन ठरत असल्याने कलम ११ नुसार अशा संस्थांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते. ठाणे जिल्ह्यात दिव्यांगांच्या पुनर्वसन, शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी आपली नोंदणी पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. विनानोंदणी कार्यरत राहणे हा गंभीर गैरप्रकार आहे. त्यामुळे सर्व संस्थांनी ३० नोव्हेंबरपूर्वी आपले प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन सपकाळे यांनी केले.

**नोंदणीसाठी संस्थांनी संबंधित जिल्ह्यातील दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रस्तावासोबत संस्थेची नोंदणी कागदपत्रे, कार्याचे तपशील, लाभार्थ्यांची माहिती आणि नियमांनुसार आवश्यक कागदपत्रे जोडावीत. नोंदणी न झाल्यास अशा संस्थांना मान्यता, निधी वा कोणताही लाभ दिला जाणार नाही, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात आली आहे.**

## मुद्रांक कार्यालयांतील व्यवहारांची दर महिन्याला तपासणी

### पार्थ पवार प्रकरणानंतर मुद्रांक विभाग सतर्क

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी पुण्यातील जमीन व्यवहार वादग्रस्त ठरल्यानंतर आता नोंदणी व मुद्रांक विभागाकडून सावध पवित्रा घेण्यात आला आहे. राज्यातील सर्व ५१९ उपनोंदणी कार्यालयांना आपल्या नोंदणी व्यवहारांची दर महिन्याच्या ५ तारखेला तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. व्यवहारांत कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावार कारवाईची शिफारस करून तसा अहवाल देण्याचे निर्देश नोंदणी आणि मुद्रांक अधीक्षक राजेंद्र मुथे यांनी काढले आहेत.

पुण्यातील हवेली येथील संयुक्त उपनोंदणी कार्यालयात महार वतन जमिनीच्या व्यवहारात अनियमितता आढळून आली. हा व्यवहार अनियमित तर होताच, शिवाय यात सरकारचे मोठ्या प्रमाणावर मुद्रांक शुल्कही बुडाले होते. पार्थ पवार यांच्याकडून हा व्यवहार झाल्याचे उघड झाल्यानंतर याला जबाबदार असलेल्या काही अधिकाऱ्यांना निलंबितही करण्यात आले. पुन्हा असे प्रकार घडून नयेत यासाठी ही बाब लक्षात आल्यानंतर नोंदणी व्यवहारात मुद्रांक शुल्कात दिल्या जाणाऱ्या सूट व सवलतींच्या सर्व कागदपत्रांची तपासणी दरमहिन्याच्या ५ तारखेपासून सुरू करून ती १० तारखेपर्यंत पूर्ण करावी असे निर्देश मुद्रांक अधीक्षकांकडून सर्व उपनोंदणी महानिरीक्षकांना देण्यात आले आहेत.






# ठाण्याचे नवीन जिल्हा शासकीय रुग्णालय येणाऱ्या पिढ्यांसाठी आशेचा किरण ठरेल

-आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर



**सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी नूतन ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालय बांधकाम स्थळाला दिली भेट**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : रुग्णालय ही फक्त इमारत एक नसते, ती मानवतेची सेवा आणि करुणेचा पाया असते. ठाण्याचे हे नवीन जिल्हा शासकीय रुग्णालय येणाऱ्या पिढ्यांसाठी आशेचा किरण ठरेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य तथा कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे केले.

राज्याचे सार्वजनिक आरोग्य तथा कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामस्थळास भेट देऊन पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी त्यांनी मुख्य रुग्णालय इमारतीमधील बाहयरुग्ण विभाग, अपघात विभाग, एमआरआय विभाग, सोनोग्राफी, सीटी स्कॅन, क्ष-किरण, मॅमोग्राफी, आंतररुग्ण विभाग, प्रसूती विभाग, मॉडयुलर शस्त्रक्रियागृह तसेच हेलीपॅड तसेच वाहनतळ इमारत व परिचारीका प्रशिक्षण केंद्र व वसतीगृह आणि वसतीगृह इमारतीची पाहणी केली.

या बांधकामाचे क्षेत्रफळ हे 92 हजार 539.00 चौ.मी. असून आरोग्य मंत्री श्री.आबिटकर यांनी पाहणी दरम्यान नवीन रुग्णालयाचे बांधकाम 87 टक्के पूर्ण झालेले पाहून समाधान व्यक्त केले. या रुग्णालयात 900 खाटांची क्षमता असून त्यात 500 खाटांचे सामान्य रुग्णालय, 200 खाटांचे महिला-बाल रुग्णालय आणि 200 खाटांचे संदर्भ सेवा रुग्णालय तसेच हेलिपॅड, परिचारिका प्रशिक्षण केंद्र, वसतिगृह, पार्किंग आणि अत्याधुनिक ICU सुविधा उपलब्ध असणार आहेत.

या रुग्णालयामध्ये मातामृत्यू व बालमृत्यू कमी करण्यासाठी आधुनिक आय. सी. यू. व नवजात बालकांसाठी आधुनिक एन.आय.सी.यू. व एसएनसीयू व इतर गरजू रुग्णांकरिता टीसीयू, आयसीयू, एनआरसी, मानसरोग, रक्तविकार व रुग्णालयीन इतर आवश्यक सुविधांबरोबर सुपर स्पेशालिटी 200 खाटांच्या रुग्णालयामध्ये हृदयविकाराच्या रुग्णांकरिता कॅथलॅब, न्यूरोलॉजी तसेच ऑनकोलॉजी व ऑनकॉसर्जरी विभाग, नेफ्रोलॉजी व डायलेसिस विभाग कार्यान्वित असणार आहेत. बालकांसाठी देखील डायलेसिसची सुविधा येथील रुग्णालयामध्ये उपलब्ध असणार आहे. सोबतच एमआरआय, सी.टी. स्कॅन व केमोथेरपी रेडिएशन थेरपी सारख्या अत्याधुनिक सुविधा या रुग्णालयामध्ये उपलब्ध आहे.

नवीन रुग्णालयामध्ये एएनएम/जीएनएम सोबत बीएससी नर्सिंग कॉलेज सुरु करणे तसेच भविष्यात मेडिकल कॉलेज सुरु करण्याबाबत आश्वासन दिले आहे. ठाणे जिल्हा रुग्णालय हे महाराष्ट्रातील आरोग्य सेवेचे सर्वात मोठे रुग्णालय होणार आहे. तसेच ठाणे जिल्ह्यामध्ये 6 महानगरपालिका, 2 नगरपरिषद व 2 नगरपंचायत महानगर हद्दीतील लोकांबरोबरच दुर्गम भागातील टोकावडे, मुरबाड, शहापूर तालुका व ग्रामीण व शहरी भाग व ठाणे जिल्ह्यातील तसेच लगतच्या पालघर, रायगड जिल्ह्यातील गुजरात सीमेपासून ते कसारा घाट, माळशेज घाट ते लोणावळा घाटापर्यंत गरजू रुग्णाला अत्याधुनिक सेवा सुविधांचा गरजू रुग्णांना याचा फायदा होणार आहे.

सद्य:स्थितीत ठाणे जिल्हा हा मुंबई शहर व उपनगर लगतचा जिल्हा आहे. तसेच ठाणे जिल्ह्यातून मुंबई-अहमदाबाद महामार्ग, मुंबई-आग्रा महामार्ग, मुंबई-अहमदनगर महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग असून विरार-अलिबाग महामार्ग व मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाचे काम सुरु आहे. तसेच लोहमार्गाचे जाळे पसरलेले आहेत. तरी महामार्गावरील अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने उपचार देण्याकरिता ठाणे जिल्हा रुग्णालय येथे व मुंबईकडे संदर्भित करावे लागते. हे रुग्णालय कार्यान्वित झाल्यानंतर सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा या रुग्णालयात उपलब्ध होवून ठाणे जिल्हा व लगतच्या सर्व जिल्ह्यातील रुग्णांना मोठ्या प्रमाणामध्ये फायदा होणार असल्याने जनतेला आरोग्य सेवांच्या उन्नतीबाबत शासनाच्या बांधिलकीचे द्योतक असून नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील, याबाबत आरोग्य मंत्री श्री.आबिटकर यांनी समाधान व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांचा ठाणे जिल्हा रुग्णालय हे सुपरस्पेशालिटी रुग्णालय हा एक महत्वकांक्षी प्रकल्प आहे. हे रुग्णालय सर्व सेवा सुविधांसह व आत्याधुनिक साहित्य सामुग्रीसह लवकरात लवकर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तसेच आरोग्य विभाग व सर्व संबंधित यंत्रणांना आवश्यक ती सर्व कार्यवाही युध्दपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच या बांधकामादरम्यान शासन स्तरावरील प्रलंबित प्रस्तावांना सकारात्मकदृष्ट्या निर्णय घेवून ती कामे तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात आले आहेत. तसेच या कामांमध्ये आरोग्य मंत्री यांच्या कार्यालयामार्फत योग्य ते सर्व सहकार्य करण्यात येणार असल्याचे मंत्री महोदयांनी आश्वासन दिले.

या दौऱ्यात विशेष कार्य अधिकारी डॉ. ए.एम. देवमाने, डॉ.अमोल भोर, आरोग्य सेवेच्या सहसंचालक डॉ.सुनिता गोल्हाईत, उपसंचालक, आरोग्य सेवा, मुं.म.ठाणे डॉ.अशोक नांदापूरकर, ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, ठाणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता, ठाणे 1 सचिन पाटील, जिल्हा मनोरुग्णालयाचे डीन डॉ.नेताजी मुळीक, श्री.कोकाटे, हर्ष कंस्ट्रक्शनचे अनिल बिरारी व इतर अधिकारी उपस्थित होते.

# मिरा-भाईंदरमध्ये गणेश नाईकांचा 'जनता दरबार'

**जनता दरबाराच्या माध्यमातून फुंकणार निवडणुकीचे रणशिंग**




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर, ता. १२ :** आगामी मिरा-भाईंदर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने एक महत्त्वपूर्ण राजकीय खेळी केली आहे. वनमंत्री आणि पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांचा जनता दरबार मिरा-भाईंदरमध्ये आयोजित करण्यात आला आहे. भाजपने नाईक यांची ठाणे जिल्ह्याचे निवडणूक प्रभारी म्हणून नुकतीच नियुक्ती केली आहे, त्यामुळे मिरा भाईंदरमधील त्यांचा हा पहिला जनता दरबार अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. हा जनता दरबार येत्या शनिवारी (ता. १५) सकाळी १० वाजता महापालिकेच्या अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर शहर ठाणे जिल्ह्यात येते आणि जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे आहेत, मात्र शिंदे यांचा एकही जनता दरबार अद्याप मिरा-भाईंदरमध्ये झालेला नाही. असे असताना, भाजपने पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांचा जनता दरबार येथे आयोजित केल्याने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

जानेवारी महिन्यात मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात युती होणार की नाही, याबाबत अजूनही साशंकता आहे. युती न होण्याची शक्यता गृहित धरून दोन्ही पक्षांनी निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. मागील निवडणुकीत दोन्ही पक्ष स्वतंत्र लढले होते आणि भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले होते. त्यामुळे यावेळीही शिवसेनेशी युती नको, असा एक मतप्रवाह भाजपमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर, भाजपने ठाणे जिल्ह्याची जबाबदारी गणेश नाईक यांच्यावर दिली आहे. त्यामुळे जनता दरबाराच्या माध्यमातून नाईक मिरा-भाईंदरमध्ये निवडणुकीचे रणशिंग फुंकणार, असे मानले जात आहे.

# कल्याण पूर्वेतील वाहतूक कोंडी शिक्षणाच्या मुळावर

## शिवसेनेकडून वाहतूक निरीक्षकांना निवेदन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. ११ (बातमीदार): कल्याण पूर्वेकडील वालधुनी ब्रिज, पत्रीपूल आणि इतर प्रमुख चौकांवरील सततच्या वाहतूक कोंडीमुळे शाळकरी मुलांचे हाल होत असून, विद्यार्थ्यांना शाळेतून घरी परतण्यासाठी दररोज तासनतास मोजावे लागत आहेत. या परिस्थितीमुळे मुलांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य धोक्यात आले असून, त्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता पालकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना शिवसेनेकडून निवेदन देण्यात आले आहे.**

रुग्णवाहिकांना तत्काळ रस्ता मोकळा करण्याच्या सवलतीप्रमाणेच शाळकरी मुलांच्या स्कूल बस आणि व्हॅननाही विशेष ओळखपत्र व सायरन सुविधा देण्यात यावी, जेणेकरून वाहतूक कोंडीतून त्यांना प्राधान्याने मार्ग दिला जाईल. हजारो लहान मुले रोज दोन ते तीन तास वाहतूक कोंडीत अडकून राहतात. ही परिस्थिती असह्य झाली आहे. शाळेच्या वाहनांना प्राधान्य सुविधा मिळाल्यास मुलांचे आयुष्य अधिक सोयीचे होईल आणि पालकांना मोठा दिलासा मिळेल, असे वाहतूक विभागाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, पालकवर्गात या मागणीला अपेक्षित समर्थन मिळत असून, सरकार आणि पोलिस प्रशासनाने तत्काळ पावले उचलली नाहीत, तर लवकरच याविरोधात जनआंदोलन उभे राहील, असा इशारा शिवसेनेने दिला आहे.

शहरात शेकडो शाळा कार्यरत असताना, आपल्या पाल्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून अनेक पालक घराजवळील शाळा टाळून दूरवर असलेल्या नामांकित किंवा आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये मुलांना प्रवेश देतात, मात्र या शाळांपर्यंत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना स्कूल बस किंवा व्हॅनद्वारे प्रवास करावा लागतो. याच प्रवासात आता अनेक तास वाया जात असल्याने त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. या दीर्घ प्रवासामुळे मुलांचा थकवा वाढतो, अभ्यासासाठी वेळ कमी मिळतो आणि त्याचा थेट परिणाम त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत असल्याचे पालकांनी सांगितले.

# प्रदूषणाने पनवेलकरांचे आरोग्य धोक्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता. १२** : पनवेल परिसरातील कळंबोली, कामोठे, खारघर आणि नवीन पनवेलमध्ये गेल्या काही दिवसांपासून रासायनांचा उग्र वास येत आहे. यामुळे डोळ्यांना चुरचुर, घशात खवखव, श्वसनाच्या तक्रारी जाणवत आहेत. काही भागांमध्ये चक्क रासायनिक वायू हवेत सोडले जात असल्याचे प्रकार समोर आले आहेत. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमधून हे वायू सोडले जात असल्याची शंका सामाजिक संस्थांनी व्यक्त केली आहे. या परिसरातील काही केमिकल आणि फार्मा कारखान्यांतून रात्री किंवा पहाटे रासायनिक वायू हवेत सोडले जात असल्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी खाडीमध्ये केमिकल सोडले जात असल्याने हवेतील प्रदूषणाचे प्रमाण वाढले असून, त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर झाला आहे.

# मुख्याध्यापकांवर शाळेची प्रगती अवलंबून असते - कमलाकांत म्हेत्रे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्रातील कामकाज अधिक प्रभावीपणे व्हावे. शासनाचे परिपत्रकाची काटेकोरमपणे अंमलबजावणी केली जावी. जसा मुख्याध्यापक तशी शाळा. मुख्याध्यापकावर शाळेची प्रगती अवलंबून असते. विद्यार्थी पटसंख्येच्या तुलनेत गेल्यावर्षी पेक्षा यावर्षी महानगरपालिकेमध्ये अर्धा टक्का तर मराठी शाळांमध्ये वाढ न होता घट होत आहे. विद्यार्थी पटसंख्येमध्ये घट होणे ही चिंतेची बाब आहे. पटसंख्येवरूनच शाळेचा दर्जा ठरवला जातो. प्रत्येक वर्षी शिक्षक अतिरिक्त होत आहेत. स्वयं अर्थसंचलितच्या शाळांना पालक प्राधान्य देत आहे. या शाळांमध्ये दिखावा केला जातो व त्यास पालक भुलतात. अनुदानित शाळेत उत्तम दर्जाचे शिक्षक, अधिकाऱ्यांकडून शाळा भेटी, विद्यार्थ्यांना अनुदान मिळत आहे तरी सुद्धा अनुदानित शाळेमध्ये पटसंख्या का कमी होत आहे याचे अंतर्मुख होऊन विचार करणे गरजेचे आहे. व्यक्तिमत्वाची जडणघडण करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. समाजात परिवर्तनासाठी शिक्षण गरजेचे आहे. त्यामुळे आपण सर्वांनी विद्यार्थ्यांचे सुरक्षेकडे गांभीर्याने लक्ष द्यावे असे मुख्याध्यापक सहविचार सभेमध्ये मार्गदर्शन करताना ठाणे महानगरपालिका शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी सांगितले.

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे वतीने शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांचे मार्गदर्शनाखाली ठाणे महानगरपालिका व अनुदानित शाळेतील मुख्याध्यापकांसाठी दिनांक 12 नोव्हेंबर 2025 रोजी ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 33, किसन नगर, ठाणे येथे मुख्याध्यापक सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र परदेशी यांनी केले कार्यक्रमासाठी गटाधिकारी संगिता बामणे मॅडम, युआसी प्रमुख मुस्ताक पठाण, रविंद्र पाटील, प्रकल्प प्रमुख चेतन देवरे गटप्रमुख, CRC प्रमुख, 300 पेक्षा जास्त मुख्याध्यापक उपस्थित होते.

सहविचार सभेमध्ये जिल्हास्तरीय तंबाखू मुक्त शाळा, वंदे मातरम उपक्रम, अपार, आधार व्हॅलिडेशन, ड्रॉप बॉक्स, स्टुडन्ट डाटा एन्ट्री, प्रधानमंत्री पोषण शक्ती अंमलबजावणी, विविध समितीचे एकत्रीकरण व कार्यवाही, विद्या समीक्षा केंद्र, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, शिष्यवृत्ती परीक्षा, संचमान्यता व विद्यार्थी सुरक्षा या विषयावरती चर्चा करून मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभारी मुख्याध्यापक दिपक मोराणकर तर आभार सौ. आशा पाटे यांनी केले.

# आश्विनी खापरे यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांना साडी वाटप व नेत्र तपासणी शिबिर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : भुवन ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माजी संचालीका सौ. आश्विनी हरेश खापरे यांनी आपल्या वाढदिवसा निमित्ताने सरळगाव येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर व सरळगाव जिल्हा परिषद गटातील सायले, साजगाव, इंदे, बंगालपाडा वाडी, इंदिरावाडी व भादाणेवाडी येथिल आदिवासी महिलांना हळदी कुंकू व साड्यांचे वाटप करून अनोख्या पद्धतीने आपला वाढदिवस साजरा केला आहे.




आश्विनी खापरे या युवा उद्योजक हरेश खापरे यांच्या पत्नी असून या दोन्ही दांम्पत्यांचा सामाजिक कार्यात नेहमीच सक्रीय सहभाग असतो.संकट काळात नेहमी धाऊन जाणारी माणसे म्हणून परिचित आहेत गेले अनेक वर्ष ते अशा प्रकारे सामाजिक काम करत आहेत. येणाऱ्या स्थानिक स्वराज संस्थेच्या जिल्हा परिषद गट सरळगाव मधून त्या निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याचे त्यांनी सांगितले आहे. पक्षाने जबाबदारी दिल्यास निश्चित अधिक जोमाने या भागातील जनतेचे व महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी सदैव कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमासाठी उदोजक हरेश खापरे, संजय हंडोरे पाटील, एकनाथ घुडे,सुशांत हरड, चंदू हरड,दिपक हरड व मोठ्या संख्येने महिलावर्ग उपस्थित होता.

# पेणची रिया कांबळे ठरली मिस रायगडची विजेती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** :स्वररंग पेण तर्फे आयोजित केलेल्या पेण फेस्टिवल 2025 मध्ये सोमवारी झालेल्या सर्वात मोठ्या मिस रायगड स्पर्धेत पेणची रिया दिनेश कांबळे ही मिस रायगडची अंतिम विजेती ठरली. तर अलिबागची प्रिया विजय पाटील या स्पर्धेतील फस्ट रनरअप तर नवी मुंबईची यशस्विनी परशुराम पाटील हिने सेकंड रनरअपचे पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेतील बेस्ट कॅटवॉक सृष्टी कांचन पेरवी (दादर), बेस्ट पर्सनालीटी यामिनी गणेश पाटील (पेण), बेस्ट स्माईल मनस्वी किशोर लोहार (पेण), बेस्ट हेअर प्रतिभा विजय वाघमारे (पेण), बेस्ट फोटोजनिक तन्वी संतोष पाटील, बेस्ट कॉस्च्यूम अपूर्वा रवींद्र पाटील (पेण) या स्पर्धकांनी पारितोषिके जिंकली. या स्पर्धेत संपूर्ण रायगड जिल्ह्यातून एकूण 18 सौदर्यवतींनी सहभाग घेतला होता. सर्वांनीच आपल्या मनमोहक अदा सादर करून रसिकांना मोहित केले. या स्पर्धेसाठी रसिकांची विशेषता युवा वर्गाची मोठी उपस्थिती दर्शविल्याने स्टेज समोरील प्रांगण खचाखच भरले होते.

सर्व विजेत्यांना शर्मिला पाटील, प्रीतम पाटील, पेण फेस्टिवल स्वररंग पेण चे अध्यक्ष राजेंद्र साळवी, पेणचे प्रसिध्द उद्योजक नरेश जैन, खजिनदार भारती साळवी, उपाध्यक्ष सुनिल पाटील, सचिव कौस्तुभ भिडे, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, अक्षता सावंत, अनिकेत साळवी, अथर्व सावंत, मृगज कुंभार, अनिरुद्ध पवार, सारिका पाटील, नेहा कुंभार, निशा साळवी, यश बांदीवडेकर, प्रसाद म्हात्रे, सृष्टी सूर्यवंशी, प्रेरणा रामधरणे, तन्वी रामधरणे, प्रशांत पाटेकर, दर्शना पाटेकर, आदि मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

मिस रायगड २०२५ मध्ये साडी रांउड, वेस्टन राउंड व ईव्हीनींग गाउन राउंड अशा तीन राऊंडमध्ये सादर करण्यात आलेल्या या स्पर्धेची कोरिओग्राफी रुपेश चव्हाण, मुंबई व सहाय्यक कोरिओग्राफर निखिल बाचल यांनी साकारली. तर टीव्ही अँकर ऋषी देसाई यांच्या उत्कृष्ठ समालोचनाची साथ या स्पर्धेला लाभली. तर परिक्षक म्हणून वडापाव सिनेमा लेखक सिद्धार्थ साळवी, डॉ.माधवी ठाकूर, डॉ.आरती चेंदवणकर, प्रो.अक्षता साळवी यांनी काम पाहिले. यावेळी पेण फेस्टिवल २०२५ला ज्या जाहिरातदार यानी दिलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. "सर्वांसाठी सर्वकाही" ही संकल्पना असलेल्या पेण फेस्टिवलला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे स्वररंगचे अध्यक्ष राजेंद्र साळवी सर यांनी सांगितले.

# भविष्यवेध



गुरुवार
१३ नोव्हेंबर २०२५

**मेष**
प्रवास आणि मीडियाशी संबंधित व्यवसाय बदलू शकतात. तुम्हाला जवळच्या मित्राकडून काही सल्ला मिळू शकतो जो खूप फायदेशीर ठरेल. सरकारी कामात लाभ मिळेल.

**वृषभ**
आज तुम्ही तुमच्या मुलांसोबत पिकनिकला जाऊ शकता. तुम्ही त्यांच्यासोबत चांगला वेळ घालवाल. महिलांसाठी आजचा दिवस खूप अनुकूल आहे; तुमचे काम सुरळीतपणे पुढे जाईल.

**मिथुन**
तणाव कमी होतील. आज तुम्ही एखाद्या चांगल्या ठिकाणी भेट देऊ शकता. तुम्हाला डोकेदुखीपासून आराम मिळेल. एकंदरीत, तुमचा दिवस उत्तम राहील. एकाग्र काम फायदेशीर ठरेल.

**कर्क**
तुमच्या प्रेम जोडीदारासाठी हा दिवस चांगला आहे. तुम्ही एका चांगल्या रेस्टॉरंटमध्येही जाऊ शकता. कोणत्याही जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करू नका. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**सिंह**
तुम्ही कमीत कमी वेळेत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल. एखाद्या गोष्टीची थोडीशी चिंता असेल, जी तुम्ही तुमच्या खास मित्रासोबत शेअर कराल, ज्यामुळे तुम्हाला आराम मिळेल.

**कन्या**
कुटुंबासह वेळ घालवाल. आज एक नवीन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकता. ऑफिसमध्ये कामाचा ताण वाढू शकतो, ज्यामुळे जास्त वेळ काम करावे लागेल. तोटा टाळता येईल. .

**तुळ**
काही राजकीय व्यक्तींसोबत तुमची फायदेशीर भेट होईल. तुम्ही घरी धार्मिक कार्यक्रम करण्याची योजना आखू शकता. चालू असलेल्या समस्या दूर होतील, हृदयात आनंद येईल.

**वृश्चिक**
कुटुंबात धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले जाऊ शकते. तुमचे जीवन सुधारण्यासाठी तुम्ही काही सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न कराल. मेहनत आणि जिद्द फळाला येईल.

**धनु**
दीर्घकालीन आरोग्य राखण्यासाठी, चांगला आहार घ्यावा. महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी चांगला दिवस आहे. नवीन व्यवसाय कराराची ऑफर मिळेल. कामे पूर्ण करण्यात व्यस्त असाल.

**मकर**
वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी हा एक चांगला दिवस आहे. महिलांचा दिवस खूप छान जाईल. व्यवसाय आज एखाद्या महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात. कर्जातून मुक्तता मिळेल.

**कुंभ**
व्यवसायाला पुढे नेण्यासाठी काही योजना बनवाल, ज्यामुळे तुम्हाला फक्त फायदाच होईल. तुम्ही तुमचा बहुतेक वेळ धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यात घालवाल

**मिन**
. बँक कर्मचारी त्यांचे काम लवकर पूर्ण करतील. प्रेमाचे मित्र एकत्र वेळ घालवतील. सामाजिक कार्यात तुमचा सहभाग तुमची ओळख वाढवेल. लोकप्रियता वाढेल, जनसंपर्कही वाढेल.



# मीरा भाईंदर मनपा हद्दीत ११४ कोटींची मुद्रांक चोरी ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यात लाखो दस्तावेज मुद्रांक शुल्काविना वापरात असल्याची भीती खरी ठरली असून मीरा भाईंदर महानगरपालिकेतील विकास हक्क हस्तांतरणाच्या (डीआरसी) ४९२ प्रकरणांत मुद्रांक वसुलीची कारवाई ठाणे मुंद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाने सुरु केली आहे. या प्रकरणांत ११४ कोटींची मुद्रांक चोरी झाल्याचा अंदाज असून दंडासह ही रक्कम ५५९ कोटींच्या घरात गेली आहे. काही दस्तावेजांची नोंदणी आवश्यक नसली तरी मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक असते.

याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. हा अहवाल प्राप्त झाला असून त्यानुसार मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ६४२ प्रकरणांपैकी ९३ प्रकरणांत मुद्रांक शुल्क भरल्याचे आढळून आले तर ५७ प्रकरणांत चार कोटी १८ लाख रुपयांची वसुली करण्यात आली. ४९२ प्रकरणांत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियममधील ३३ कलमान्वये वसुलीची नोटिस जारी करण्यात आली आहे.

हा घोटाळा अमोल राकवी, अजय धोका आणि विकास पाटील या नागरिकांनी उघड केला. मीरा भाईंदर महापालिकेवर त्यांनी प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले असून विकास हक्क हस्तांतरण प्रमाणपत्रांवर (डीआरसी) मुद्रांक शुल्क भरला नसल्याचे त्यांना अनेक प्रकरणांत आढळले. याबाबत ठाणे जिल्हा सहनिबंधक कार्यालयाने नोटिसाही जारी केल्या. परंतु वसुलीची कारवाई केली नाही. त्यानंतर 'अभय योजना जारी झाली आणि वसुलीला वेग आला. याबाबत पाठपुरावा झाला नसता तर मुद्रांक शुल्क व दंडाची वसुली झालीच नसती, याकडे राकवी यांनी लक्ष वेधले. नोटरी करुन अशी प्रमाणपत्रे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्वीकारली. वास्तविक त्यांनी मुंद्रांक जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविणे आवश्यक होते. त्यामुळेच हा घोटाळा होऊ शकला, असेही राकवी यांनी सांगितले.

**या अनियमिततेची दखल पहिल्यांदा तत्कालीन नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक श्रावण हर्डीकर यांनी घेतली. ८ डिसेंबर २०२१ रोजी राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आयुक्तांना, जिल्हाधिकाऱ्यांना तसेच मुख्य अधिकाऱ्यांना पत्र लिहून अशा दस्तावेजांवर मुद्रांक शुल्क भरले जाईल तसेच आवश्यकता असल्यास नोंदणी झाल्याबाबत दक्षता बाळगण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर महसूल विभागाचे तत्कालीन अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांनीही २८ जून २०२४ मध्ये पुन्हा परिपत्रक जारी केले. परंतु फक्त परिपत्रक जारी करण्यापलीकडे राज्य शासनाची वसुलीची इच्छा नसल्याचे आढळून आले आहे. याबाबत ठाणे शहर मुद्रांक जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता, आपल्याला याबाबत माहिती घ्यावी लागेल, असे सांगितले. चव्हाण यांनीच हा अहवाल राज्य शासनाला सादर केला आहे.**



# राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये नवी मुंबई महापालिकेची बाजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** जलसंरक्षण आणि जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरी करीत महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळवला असून, गुजरात दुसऱ्या तर हरियाणा तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्थानिक स्वराज्य संस्था गटात नवी मुंबई महापालिकेने प्रथम पुरस्कार तर पाणी वापर संस्थामध्ये नाशिक जिल्ह्यातील कानिफनाथ संस्थेने व्दितीय क्रमांक पटकावला आहे. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या जलसंसाधन, नदीविकास आणि गंगा संरक्षण विभागातर्फे जलसंरक्षण आणि जलव्यवस्थापनातील उत्कृष्ट कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जल पुरस्कारांची घोषणा जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी मंगळवारी केली. पुरस्कार वितरण येत्या १८ नोव्हेंबरला नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होणार आहे. देशातील प्रत्येक स्तरावर जलसंरक्षण आणि जलसाक्षरतेला चालना देणे हा या पुरस्कारांचा मुख्य उद्देश असल्याचे पाटील यांनी सांगितले. यंदा १० विविध श्रेणींमध्ये संयुक्त विजेत्यांसह एकूण ४६ संस्था आणि व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. या पुरस्कारांसाठी देशभरातून ७५९ अर्ज प्राप्त झाले होते. केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय भूजल मंडळ यांनी प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर केले. त्यानंतर स्वतंत्र निर्णायक मंडळाने विजेत्यांची निवड केली आहे.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सा.बां.विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत "इमारत देखभाल व दुरुस्ती" या लेखाशिर्षक अंतर्गत "आवश्यक दुरूस्ती" अशा प्रकारच्या ०२ कामांकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे. अशा कंत्राटदारांना सदरच्या निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर दि.१३/११/२०२५ ते दि.२०/११/२०२५ रोजीपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि.२०/११/२०२५ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.२१/११/२०२५ रोजी १६.३० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्र.०२२-२५३४७७१४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

ठामपा/पिआरओ/सा.बा/८४४/२०२५-२६ **सही/-**
दि.१२.११.२०२५ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सा. बां. विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये ``दवाखाना दुरुस्ती`` या लेखाशिर्षांतर्गत अस्तित्वातील स्थलांतरीत ढोकाळी आरोग्य केंद्र मधील प्लंबींग सॅनिटेशन पाईपलाईन, टॉयलेट ब्लॉक दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची टाकी साफ करणे आणि इतर कामे करणे अशा एकुण एक कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगर पालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि. १३/११/२०२५ ते दि. २०/११/२०२५ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ येथे दि. २०/११/२०२५ पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि. २१/११/२०२५ रोजी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा-मा.मा.प्र.स/८४६/२०२५-२६ सही/-
दि:१२.११.२०२५ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**


# एज्युसिटी प्रकल्पाला सिडकोकडून गती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून पाच किलोमीटर अंतरावर महाराष्ट्र सरकारचा आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण राज्यांतर्गत देण्याचा महत्त्वाकांक्षी एज्युसिटी प्रकल्प आता अंमलबजावणीच्या निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. या प्रकल्पासाठी सिडकोने सुमारे २५० एकर क्षेत्र राखीव ठेवले आहे. या प्रकल्पासाठी ८५ टक्के भूसंपादनाचे काम पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक '४ ब' वरून या प्रकल्पापर्यंत पोहचण्यासाठी पोहोच रस्ते बांधणीच्या कामासाठी ११६ कोटी रुपयांची निविदा नुकतीच सिडकोने जाहीर केली. पहिल्या टप्प्यात सिडको मंडळ एज्युसिटी प्रकल्पापर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता बांधण्याचे काम हाती घेणार आहे. या निविदेमध्ये एनएच ४ बी महामार्गालगतच्या कुंडेवहाळ गावाजवळून थेट एज्युसिटी प्रकल्पासाठी पोहचण्यासाठी सुमारे १.१ किलोमीटर अंतरावर ४५ ते ३० मीटर रुंदीचा हा मार्ग बांधण्यासाठीची ही निविदा आहे. यासाठी सिडको ११६.५३ कोटी रुपये खर्च करणार आहे.

# बेकायदा वॉशिंग सेंटरला केडीएमसीचा दणका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. १२** ठाकुर्लीतील रेल्वे समांतर रस्त्याकडेला फुटपाथवर बेकायदा वॉशिंग सेंटर सुरू करण्यात आ होते. याविषयी वृत्त प्रसारित होताच 'ग' प्रभागाच्या सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण पथकाने तत्काळ धडक कारवाई करत अनधिकृत पाण्याची जोडणी, टाकी काढून टाकत हे सेंटर बंद केले आहे.

**फुटपाथवर वॉशिंग सेंटर उभारणे हे योग्य नाही. कोणत्याही परिस्थितीत असे बेकायदा वॉशिंग सेंटर चालू दिले जाणार नाहीत. पुढे अशा प्रकारचे आढळल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल. पुढील काळात शहरातील अनधिकृत वॉशिंग सेंटरची तपासणी करण्यात येईल**

**- हेमा मुंबरकर,**
**सहाय्यक प्रभाग आयुक्त**

कल्याण-डोंबिवली शहराला जोडणारा ठाकुर्ली रेल्वे समांतर रस्त्याकडेला असलेला फुटपाथ गिळंकृत करत काही माफियांनी येथे वॉशिंग सेंटर सुरू केले होते. दिवसाढवळ्या येथे गाड्या धुण्याचे काम सुरू होते. येथे बाजूलाच पालिका प्रशासनाचे सार्वजनिक शौचालय आहे. या शौचालयासाठी असलेल्या पाण्याचा वापर गाड्या धुण्यासाठी केला जात होता. दररोज हजारो लिटर पाणी गाड्या धुण्यासाठी वापरले जात होते. यासोबत फुटपाथच्या बाजूला काही बेकायदा गाळेदेखील उभारले गेले होते. दरम्यान, पालिकेच्या कारवाईनंतर नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

ग प्रभागाच्या अतिक्रमण हटाव पथकाकडून दोन-तीन दिवसांपूर्वी या बेकायदा वॉशिंग सेंटर आणि गाळ्यावर तोडकामाची कारवाई करण्यात आली. हेमा मुंबरकर यांच्या आदेशानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. तुर्तास या सेंटरला होणारा पाणीपुरवठा थांबवला आहे. सेंटरवर वापरले जाणारे उपकरण, पाइप व इतर साहित्य हटवण्यात आले आहेत.




# खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांसंदर्भात महापालिका स्तरावर समिती गठीत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मा. उच्च न्यायालयातील सुमोटो जनहीत याचिका क्र.७१/२०१३ मधील दि.१३/१०/२०२५ च्या आदेशानुसार रस्तत्यावरील खड्डयांसंदर्भात घडणाऱ्या अपघातांबाबत संबंधितांना आवश्यक तपासणी करुन नुकसान भरपाई देणे व आदेशात नमूद इतर बाबी संदर्भात कार्यवाही करणे करीता महापालिका स्तरावर समिती गठीत करण्यात आलेली असून त्यांचे कडुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

सदर प्रकरणी कल्याण डोंबिवली महानगरपालिके करीता संपर्क ई मेल ce.kdmc@gmail.com व संपर्क अधिकारी कार्यकारी अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे असतील. अशी माहिती कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी यांनी प्रसिध्दी पत्रकामार्फत दिली आहे

### निवडणूक आयोगाकडून
# राज्यातील 435 पक्षांची नवी यादी जाहीर

**शिवसेना-राष्ट्रवादी दोन गटांसह राज्यातील 435 पक्षांची नवी यादी निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आली असून निवडणूक चिन्हांचं वाटप करण्यात आलं आहे. यादीत तुतारी' आणि 'मशाल' चिन्हांना स्थान देण्यात आलं आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मशाल आणि तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्हे कायम ठेवण्यात आली आहेत.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबईः** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील पात्र ४३५ राजकीय पक्षांची अधिकृत यादी मंगळवारी जाहीर केली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मशाल आणि तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्हे कायम ठेवण्यात आली आहेत.

राजपत्रातील यादीत ५ राष्ट्रीय पक्ष, महाराष्ट्रातील ५ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर राज्यांतील ९ राज्यस्तरीय पक्षांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच, निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या ४१६ राजकीय मान्यताप्राप्त असलेल्या पक्षांचे चिन्हांसहित यादी प्रसिद्ध केली आहे. या यादीत शिवसेना (ठाकरे) पक्षाचे 'मशाल' चिन्ह, शिवसेना (शिंदे) पक्षाचे 'धनुष्यबाण' चिन्ह, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे 'घड्याळ' आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या 'तुतारी वाजवणारा माणूस' या चारही चिन्हांना नावांसहित वेगळे स्थान देण्यात आले आहे. आयोगाने दोन्ही पक्षांच्या चिन्ह आणि नावावरील वादाचा अंतिम निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर अवलंबून असल्याचे स्पष्ट केले आहे.

**पिपाणीला वगळले**

**न्यायालयाच्या आदेशानंतर आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेसला (शरद पवार) तुतारी वाजवणारा माणूस हे निवडणूक चिन्ह दिले. मात्र लोकसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस आणि पिपाणी हे दोन चिन्ह असल्याने मत विभाजन झाल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आला होता. पिपाणी हे चिन्ह काढून टाकावे अशी मागणी केली होती. आयोगाने जाहीर केलेल्या राजपत्रात त्यानुसार पिपाणी या चिन्हाला वगळण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेससाठी (शरद पवार) हा निर्णय मोठा दिलासादायक ठरला आहे.**






# "जय श्री राम" बोलल्याचा राग शिक्षकाची विद्यार्थ्यास बेदम मारहाण

## पालकासमोर गुडघे टेकून मागितली माफी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी) : पेण तालुक्यातील जोहे येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचालित न्यू इंग्लिश स्कूल येथे "जय श्री राम" चा नारा दिल्यामुळे येथील शिक्षकाने कळवे गावातील विद्यार्थ्यास बेदम मारहाण दिला.त्या निषेधार्थ कळवे गावातील असंख्य नागरिक जाब विचारण्यासाठी जोहे हायस्कूल येथे गेले होते.**

कळवे पेण येथील भानुदास एकनाथ पाटील यांचा मुलगा ८ वीत शिकत असून ११ नोव्हेंबर २०२५ रोजी या विद्यालयातील मोमिन शिक्षक " वर्गात आले तर कोणीतरी एक-दोन विद्यार्थी " जय श्री राम" म्हणाले म्हणून मोमिन सर यांनी सदर विद्यार्थी मुलगा 'आयुष' समजून बेदम मारहाण केली यामुळे संतप्त नागरिकांनी व पालकांनी त्यांना निलंबित करून मोठी कारवाई करावी ही विनंती करण्यात आली.दरम्यान प्रकरण दादर सागरी पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचल्याने सदर मोमीन शिक्षकांनी गुडघे टेकून माफी मागितली व यापुढे मी असे कृत्य करणारे नाही असे सांगितले.

सदर शिक्षकास दादर पोलिस स्टेशनचे निरीक्षक संजय ब्राम्हणे त्याला ताब्यात घेतले आहे व पेण पोलिस स्टेशनला आणले आहे.

### सँडहर्स्ट रोड रेल्वे दुर्घटना प्रकरण
# पाच दिवस उलटूनही एफआयआर नाही?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या दुर्घटनेला तब्बल पाच दिवस उलटून गेले तरीही शासकीय रेल्वे पोलिसांनी (जीआरपी) अद्याप या प्रकरणी गुन्हा नोंदवलेला नाही. अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रवासी आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार, अद्याप कोणत्याही रेल्वे कर्मचाऱ्याचा जबाब घेण्यात आलेला नाही.

जीआरपीने या प्रकरणी 'वेट अँड वॉच' भूमिका घेतली आहे. सर्व पुरावे आणि साक्षीदारांचे जबाब तपासल्यानंतरच पुढील कारवाई केली जाईल, असे जीआरपीकडून सांगण्यात आले आहे.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
**सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा** मुंबई विद्यापीठाशी संलग्न

**ADMISSION OPEN 2025-26**

**११ वी व १२ वी**
ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS

POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY

Look forward to a BRIGHTER FUTURE

7038658191
9130580111


# आरक्षणानंतर वसई-विरारमध्ये इच्छुकांच्या पदरी निराशा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई ता. १२ (बातमीदार)** वसई-विरार शहर महापालिका निवडणुकीची प्रभागरचना जाहीर झाल्यानंतर सर्वांचे लक्ष आरक्षणाकडे लागले होते. मंगळवारी (ता. ११) आरक्षण जाहीर होताच वसई-विरारच्या राजकीय वर्तुळात कुठे आनंद, तर कुठे मोठा हिरमोड झाल्याचे दिसून आले.

आरक्षणाच्या फेऱ्यात अनेक इच्छुकांना मोठा फटका बसला असून, त्यांची पदरी निराशा आली आहे. महापालिका निवडणुकीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, खुला प्रवर्ग आणि ओबीसी महिला या प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाले आहे.

आरक्षण जाहीर होताच अनेक इच्छुक उमेदवारांनी आपल्या प्रभागात कोणते आरक्षण आहे, हे तपासण्यास सुरुवात केली. ज्यांचा वॉर्ड लढण्यासाठी सुरक्षित झाला, त्यांनी आनंद व्यक्त केला; मात्र आरक्षणामुळे ज्यांचा पत्ता कट झाला, अशा अनेकांनी आता उमेदवारी मिळणार नाही म्हणून चुप्पी साधली आहे. महापालिकेत एकूण ११५ सदस्यसंख्या असणार आहे. त्यापैकी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव असून, उर्वरित जागांवर आरक्षण जाहीर झाले आहे. ज्या प्रभागात महिलांसाठी आरक्षित किंवा खुल्या प्रवर्गातून जागा सोडण्यात आल्या आहेत, त्याच प्रभागात अन्य दोन जागांवर आपल्याला संधी मिळेल, अशी आशा आता काही इच्छुकांमध्ये निर्माण झाली आहे.

# 'आजीबाईंची शाळा' उपक्रमातून मुरबाड तालुक्यात प्रौढांसाठी शिक्षणयज्ञ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - शिक्षणासाठी कोणतेही वय नसते असे म्हटले जाते. दरम्यान, हेच वाक्य मुरबाड तालुक्यातील फांगणे गावात वास्तव्यात आणण्यात आले आहे. मुरबाडमधील फांगणे गावात ६० ते ९७ वय असणाऱ्या आजीबाई मागील ९ वर्षांपासून शिक्षण घेत आहेत. 'आम्हाला लिहता वाचता येत असते तर, शिवजयंतीच्या आनंदोत्सवात आम्हीही सहभागी झालो असतो' अशी खंत काही वर्षांपुर्वी आजींनी व्यक्त केली होती. यातूनच 'आजीबाईंची शाळा' या अनोख्या उपक्रमास सुरूवात होऊन आजपर्यंत हा उपक्रम राबविला जात आहे.

शिक्षण ही मानवाच्या मुलभूत गरजांपैकी एक गरज मानली जाते. शिक्षणाला कोणतीही वयोमर्यादा नसते. मुरबाड तालुक्यातील फांगणे गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सव सुरू होता. त्यावेळी १०० महिला शिवरायाच्या चरित्राचे पठण करित होता. मात्र, यावेळी याच गावातील काही आजी पुढे येत 'आम्हालाही लिहता वाचता येत असते तर, शिवरायांच्या आनंदोत्सवात आम्ही देखिल सहभागी झालो असतो. परंतू लिहता वाचता येत नसल्याने सहभागी होणे शक्य नाही', अशी खंत आजींनी व्यक्त केली. त्यानंतर आजींच्या शिक्षणयज्ञास सुरूवात झाली. ८ मार्च २०१६ मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त आजीबाईंची शाळा हा उपक्रम सुरू करण्यात आला.


ठाणे ■ गुरुवार
१३ नोव्हेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता




# पेण नगरपालिकेत उमेदवारीसाठी रस्सीखेच

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण, ता. १२ (वार्ताहर)** : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे. पेण नगरपालिकेसाठी १० ते १७ नोव्हेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, मात्र भाजप, अजित पवार राष्ट्रवादी गट आणि शिवसेना शिंदे गट या महायुतीमध्ये जागावाटपावरून अजूनही मोठी रस्सीखेच सुरू आहे. एकीकडे महायुतीत तिढा कायम असताना, दुसरीकडे अनेक इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती भाजपच्या माध्यमातून आमदार रवीशेठ पाटील यांच्या 'वैकुंठ' निवासस्थानी अजूनही सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे पेण नगरपालिका निवडणुकीत खरी रंगत आली आहे. २ डिसेंबर रोजी पेण नगरपालिका निवडणूक होणार असून, यामध्ये एकूण १२ प्रभागांमधून २४ नगरसेवक निवडून जाणार आहेत. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष आपल्या परीने उमेदवारांची चाचणी करत मोर्चेबांधणी करत आहेत. भाजप, अजित पवार गट आणि शिंदे शिवसेना गट या महायुतीत जागावाटपावरून अजूनही अंतिम निर्णय झालेला नाही. शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शेकापक्ष या महाविकास आघाडीचेही उमेदवार अजूनही निश्चित झालेले नाहीत, तर मनसेनेसुद्धा अजून आपला उमेदवार जाहीर केलेला नाही. त्यामुळे ते या निवडणुकीत महाविकास आघाडीसोबत जाण्याचे चिन्ह दिसत आहे. सर्व प्रमुख पक्षांमध्ये उमेदवारीबाबत संभ्रम असल्याने अनेक इच्छुक उमेदवार प्रतीक्षेत आहेत.

# निवडणुकीचे बिगुल वाजताच नाराज जनता गप्प का झाली? - सी.आर.म्हात्रे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : निवडणूक जाहीर होण्या अगोदर प्रश्न ,आंदोलने, उपोषणे, मोर्चे धरणे धरणारी जनता, विविध प्रश्नावर आवाज उठविणारी जनता एकदम शांत झाली.एका क्षणात शांती पसरली .निवडणुकीच्या गोंगाटात सर्वच अचानक असंतोषाचे सूर स्तब्ध झाले. लोकशाहीसाठी पोषक आवाज थांबला असे चित्र आत्ता तरी दिसून येते. ही चुप्पी अचानक का आली याची कारणे सामान्य जनतेच्या आवाक्या बाहेरची आहेत.काल,परवा पर्यंत सरकारला जाब विचारणारे,प्रश्न विचारणारे लोक मात्र आज दिसून येत नाहीत.वास्तविक लोकांचा आवाज हाच लोकशाहीचा आत्मा आहे,हाच कोठेतरी हरवलेला दिसतो.हा आवाज न दिसणे ही समाधानाची बाब नाही.ही संभ्रमाची परिस्थिती आहे. खरच ही जनता समाधानी आहे का?का निराशेने मौन बाळगले आहे अशी खंत पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केली.

काही दिवसापूर्वी शेतकऱ्यांचे प्रश्न, सततची वाढती महागाई, बेरोजगारी, पाणी,आरोग्य, रस्ते,स्वच्छता, यांना अनेक प्रश्नावर जनतेचा आक्रोश दिसत होता.बऱ्याच वेळा शाळजोडीतले हाणत होती. मात्र या निवडणुकीने हा असंतोष जणू गाठोड्यात गुंडाळून ठेवला गेला असे काहीसे चित्र दिसून येते. मात्र ही चुप्पी नक्कीच असमाधानाची असणार.

सर्वांनी निराश बोलणे टाळले आहे ,उगाच नाराजी न ओढवलेली बरी. काहीच्या मते जनतेच्या आवाजाचा परिणाम होत नाही.त्या आवाजाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे .निवेदने,बैठका,मोर्चे,धरणे, याचा शेवट शून्यात जात असल्याने जनतेने मौन ही हत्यार उचलले आहे. का असा सवाल ही केला आहे.

दुसरीकडे पक्षीय प्रचार यंत्रणा प्रभावी बनत आहे. घोषणांचा पाऊस, आणि सोसियल मीडियाची चकाकी यामुळे खरी समस्या झाकोळली जात तर नाही ना?असा प्रश्न निर्माण होत आहे.हा शून्यात असणारा आवाज लोकशाही ला घटक समजतो ठरेल.गप्प जनता ही दुर्बल लोकशाहीचे लक्षण आहे अशी खंत ही सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केली.

लोकशाही ही केवळ मतदानापूरती मर्यादित नाहीतर ती लोकांच्या सक्रिय सहभागावर टिकून राहते.वेळोवेळी सरकारला प्रश्न विचाराने,त्यांच्या चुका असतील तर त्या वेळीच निदर्शनास असून देणे ,त्यासाठी योग्य पर्याय सुचविणे,हे जागरूक नागरिकांचे कर्तव्य आहे.हे जर थांबले तर सरकारला उत्तरदायित्वाची जाणीव राहणार नाही. कदाचित ही चुप्पी घातक होऊ शकेल,ही खोट्या समाधानाची असेल तर लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात राहील. यासाठी नागरिकांनी प्रकट झाले पाहिजे. आपल्या भविष्यासाठी ही हितकारक ठरेल.असे सी आर म्हात्रे यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांचा नैसर्गिक प्रसूतीवर भर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, ता. १२ :** प्रसूती म्हटले की, महिलेचा एकप्रकारे पुनर्जन्मच असतो. त्यातच अनेक महिलांना प्रसूतीदरम्यान होणाऱ्या वेदना असहनीय असतात. त्यामुळे बहुंताश खासगी रुग्णालयाचा कल हा सर्वाधिक सीझर प्रसूती करण्यावर असतो. त्यातच आता, सीझर ही पद्धतच रूढ होताना दिसत आहे. ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयासह प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाकडून सीझरपेक्षा नॉर्मल प्रसूतीलाच पहिली पसंती दिली जात आहे. मागील तीन वर्षात जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयात ४७ हजार ८६४ प्रसूती करण्यात आल्या आहेत. यापैकी ३२ हजार ४५३ प्रसूती या नॉर्मल करण्यात आल्या आहेत.

सीझर प्रसूतीच्या जमान्यात ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयासह प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने नॉर्मल प्रसूतीवर भर देत आहे. अशातही प्रसूतीच्या काळात गुंतागुंतीची अथवा आणीबाणीची परिस्थिती उद्भवल्यास सीझर पद्धतीचा अवलंब केला जात असल्याचे रुग्णालयाकडून सांगण्यात आले. त्यानुसार ठाणे जिल्ह्यातील जिल्हा सरकारी रुग्णालयाच्या अंतर्गतील १३ रुग्णालयांमध्ये २०२३-२०२४ ते एप्रिल ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ४७ हजार ८६४ प्रसूती झाल्या. यामध्ये सर्वाधिक ३२ हजार ४५३ या नॉर्मल प्रसूती, तर १५ हजार ४११ सीझर प्रसूती झाल्या असल्याची माहिती जिल्हा रुग्णालय प्रशासनाने दिली.

## गैरसमज दूर करून नॉर्मलवर भर

**अनेक महिलांच्या मनात प्रसूतीच्या काळात उद्भवणाऱ्या समस्यांची भीती सतावत असते. ही भीती दूर करून त्यांची नॉर्मल प्रसूती करण्यावर डॉक्टरांकडून भर देण्यात येत असतो, मात्र प्रसूतीच्या काळात गुंतागुंतीची परिस्थिती उद्भवल्यानंतरच सीझर प्रसूतीचा पर्याय निवडला जात आहे. प्रत्येक गरोदर महिलेनेदेखील आठव्या महिन्यापासून मानसिक आणि शारीरिक तयारी करणे गरजेचे असल्याचे मत स्त्रीरोगतज्ज्ञांनी व्यक्त केले.**


## Public Notice

Notice inviting claims or objections to the transfer of shares and the interest of the deceased Member in the capital/ property of the society. Shri Vijaypal Rajkishore Singh a member of the ShreeKrishna Cooperative Housing Society Ltd. having address at Shop No.1 Ground floor, situated in society's building No.3(old No.1) died on 15/07/2003 without making any nomination.

The society hereby invites claims or objections from " the heir or heirs or other claimant or claimants or injectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within the period of 15 days from the publication of this notice with the copies of such documents and other proofs in support of his/her/ their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/property of the society in such manner as is provided under the Bye Laws of the society.

The claims / objections if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under Bye Laws of the society. A copy of the registered Bye Laws of the society is available for inspection by the claimants/ objectors in the office of the society/ with the Secretary of the society between 11.30 am to 2.00 pm from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place: Kalyan
Date:

**For and on behalf of**
**The ShreeKrishna Cooperative Housing Society Ltd**
**Hon. Secretary.**


# सरकारी धान्याचा काळाबाजार करणारे मोकाट

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर** : भिवंडीच्या सरकारी गोदामातून शहापूर तालुक्यातील अघईच्या रेशन दुकानात जाणारे धान्य काळ्याबाजारात विक्रीसाठी चाललेला ट्रक शहापूर पोलिसांनी पकडल्यानंतर धान्यांचा काळाबाजार करणाऱ्या रॅकेटचा शोध घेण्यासाठी तहसीलदारांनी तपास करण्यास सुरुवात केली आहे.

तहसीलदार परमेश्वर कासुळे आणि पुरवठा निरीक्षण अधिकारी अमृता सूर्यवंशी यांनी ज्या खासगी गोदामाजवळ धान्याचा ट्रक उभा होता. त्या गोदामाची झाडाझडती घेतली असता, त्यामध्ये धान्याच्या पावत्या व गोदामामधील आढळून आलेला साठा यात तफावत आढळून आला. ६९५ क्विंटल तांदूळ जादा आढळला, तसेच या तांदळामध्ये सरकारकडून वितरित होणारा (एफआरके) तांदूळ निदर्शनास आल्याने राइसमील आणि खासगी गोदामांना सील ठोकण्याची कारवाई केली, तसेच शहापूर पोलिस ठाण्यातही गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

धान्य ट्रकमध्ये असलेले कोणत्या शिधावाटप दुकानदाराचे आहे ते नाव मात्र गुलदस्त्यात आहे. धान्यासह ट्रक पकडून पाच दिवस झाले, तरी काळाबाजार करणारे अद्याप मोकाट आहेत.

दरम्यान, शहापूरचे पोलिस निरीक्षक मुकेश ढगे यांनी या प्रकरणी लवकरच छडा लावण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

# उद्यमशिलतेतून महिलांनी सक्षम व्हावे

## - जिल्हाधिकारी किशन जावळे



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड** : उद्यम शिलतेतून सक्षम व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) अहमदाबाद उदया प्रकल्प कार्यालय अलिबाग व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई पुरस्कृत नावडे पनवेल को ऑफ इंडस्ट्रीज सभागृह पनवेल येथे (दि.11 नोव्हेंबर) रोजी आयोजित महिलांकरीता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमात केले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पनवेल तहसिलदार मिनल भांबरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळया, रायगड जिल्हा बँक तळोजाचे व्यवस्थापक नितेश तोंडसे, उद्योजक विजय लोखंडे, उद्योजक लक्ष्मण जाधव सामाजिक कार्यकर्त्या व उद्योजिका श्रीमती राजश्री पाटील उपस्थित होते.

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) व टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायीत्व विभागाकडून पुरस्कृत उदया प्रकल्पांतर्गत दोन आठवडे कालावधीचे महिला व दिव्यांगांकरीता उद्योजकता विकास कार्यक्रम घेण्यात आला होता. कार्यक्रमात सर्व प्रथम ईडीआयचे प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवून नावडे येथील महिला प्रशिक्षणार्थींनी सुरु केलेल्या माऊली भाकरी सेंटर चे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री.जावळे यांच्याहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाकरीता रायगड जिल्हा बँकेचे व जिल्हा उद्योग केंद्राचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन ईडीआय अलिबाग प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी केले. या कार्यक्रमाला महिला प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# गुजरातचा पराभव करीत मुंबई संघ अंतिम विजेता



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : विरार येथील नारिंगी ग्रामस्थ क्रीडा मैदानावर ७ ते ९ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या पीडी वेस्ट झोन चॅम्पियनशिप २०२५ ही स्पर्धा मुंबई संघाने डोंबिवलीच्या रवींद्र संते यांच्या नेतृत्वाखाली खेळून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. तसेच संपूर्ण स्पर्धेत अजिंक्य राखत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या स्पर्धेत वेस्ट झोन क्रिकेट क्षेत्रात येणाऱ्या मुंबई, महाराष्ट्र, गुजरात, बडोदा आणि सौराष्ट्र अशा पाच संघांनी भाग घेतला होता.

अंतिम सामना मुंबई विरुद्ध गुजरात यांच्यात झाला. नाणेफेक जिंकून गुजरात संघाने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत १२८ धावा केल्या. तर मुंबई संघाने फक्त २ गडी गमावत अवघ्या १५ षटकांत सहजपणे १२९ धावांचा पाठलाग पूर्ण केला.

अंतिम सामन्यात सलामीला आलेल्या प्रसाद चौहान याने नाबाद ८४ धावा करत सामनावीराचा पुरस्कार पटकावला. स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज आकाश सानप (२२६ धावा), उत्कृष्ट गोलंदाज गणेश पिसाळ (७ विकेट्स) तर प्लेयर ऑफ द टूर्नामेंटचा पुरस्कार आकाश पाटील (११५ धावा व ७विकेट्स) याने पटकावला.

# आदिशक्ती मुंबादेवी अर्बन निधीच्या चेअरमन पदी जयश्री कोपर्डीकर



## व्हॉइस चेअरमन पदी कुंजबिहारी दधीच

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : आदिशक्ती मुंबादेवी अर्बन निधी लिमिटेड मुंबई या वित्तीय संस्थेचा चेअरमन आणि व्हॉइस चेअरमन पदी नवीन नियुक्ती संस्थेच्या ठरावाद्वारे नुकतीच करण्यात आलेली आहे. आदिशक्ती मुंबादेवी अर्बन निधीच्या चेअरमन पदी कल्याण मधील जयश्री कोपर्डीकर तर व्हॉइस चेअरमन पदी कुंजबिहारी दधीच यांची निवड करण्यात आली आहे. यापुढील वित्तीय वर्षासाठी जयश्री कोपर्डीकर चेअरमन आणि कुंजबिहारी दधीच व्हाईस चेअरमन यांना सर्व सह्यांचे आणि निधी बँकेच्या वाढीसाठीच्या अधिकार सर्वानुमते देण्यात आले आहेत. या दोघांचे सर्वच थरातील व्यक्तींनी अभिनंदन केले आहे.

## दु:खद निधन

### सोदराबाई राठोड यांचे निधन



राष्ट्रीय बंजारा टायगर्सचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा जय सेवालाल बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक चव्हाण यांच्या आजी लिहे दिगर, ता.जामनेर येथील रहिवासी सोदराबाई भासू राठोड(वय-९०'वर्ष) यांचे आज दि.१२/११/२०२५ बुधवारी दुपारी वृध्दापकाळाने निधन झाले. सोदराबाई राठोड यांची अंत्ययात्रा गुरुवारी निघणार आहे. सोदराबाई राठोड यांच्या पश्च्यात ३ मुले,३ मुली आणि सुना व नातवंडे असा परिवार आहे.

# कल्याण उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात दुचाकी वाहनांसाठी नविन मालिका सुरु

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण येथे दुचाकी या संवर्गासाठी MH05GF ही नविन मालिका साधारणतः दि.19 नोव्हेंबर 2025 रोजी सुरु करण्यात येणार आहे. तरी नवीन दुचाकी वाहनांसाठी आकर्षक क्रमांक घेण्यासाठीचे अर्ज दि.12 ते 14 नोव्हेंबर 2025 या कालावधीत स्विकारले जातील, असे कल्याण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.



**आकर्षक क्रमांक घेण्यासाठीचे अर्ज दि.12 ते 14 नोव्हेंबर 2025 या कालावधीत स्विकारले जातील**






# तरुणाच्या हत्येप्रकरणी मानपाडा पोलिसांकडून सहा जणांना अटक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** हॉटेलच्या दारावर धक्का लागल्यानंतर वाद होऊन एका तरुणाने आपल्या साथीदारांना बोलवून आकाश सिंग नावाच्या तरुणाला बेदम मारहाण केली. धारदार शस्त्राने आकाश याच्यावर वार केले गेले, त्यात आकाश सिंग याचा मृत्यू झाला. डोंबिवलीतील मालवण किनारा हॉटेल समोर हा प्रकार घडला होता. याप्रकरणात मानपाडा पोलीसांनी गुन्हा दाखल करीत आरोपींचा शोध सुरु केला. अखेर या प्रकरणात 6 आरोपींना पोलीसांनी 48 तासांत अटक केली आहे.

रविवारी रात्री मानपाडा पोलीस स्टेशनच्या हददीत मालवण किनारा हॉटेलच्या बाजुला गुन्हयातील मयत इसम व त्याचे मित्र हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी आले असता धक्का लागल्याच्या कारणावरून अनोळखी ५ ते ६ इसमांनी मयत आकाश याला जबर मारहाण करून धारधार चाकुने त्याच्या छातीत वार करून त्यास जिवे ठार मारून पळुन गेले होते. लागलीच पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, सहा. पोलीस आयुक्त सुहास हेमाडे, वपोनि संदिपान शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी वेगवेगळी पोलीस पथके तयार करून अनोळखी आरोपींचा तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीद्वार मार्फत नाशिक, मालेगाव, चाळीसगाव या ठिकाणी कसुन शोध घेतला.

सपोनि संपत फडोळ व पोलीस पथक यांनी गुन्हयातील फरार सहा अनोळखी आरोपीतांना नाशिक शहर पोलीसांच्या मदतीने पाठलाग करून ताब्यात घेवुन ४८ तासाच्या आत अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे. या गुन्ह्यात अमर महाजन, अक्षयकुमार वागळे, अतुल कांबळे, निलेश ठोसर, प्रतिकसिंग चौहान, लोकेश चौधरी अशी अटक आरोपींची नावे आहेत. या गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक जयपालसिंह राजपुत हे करीत आहे.




हि कामगिरी पोलीस निरीक्षक जयपालसिंह राजपुत, लक्ष्मण साबळे, मनिषा वर्षे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संपत फडोळ, महेश राळेभात, सागर चव्हाण, सपोउनि सुनिल पवार, पोहवा संजु मासाळ, शिरीष पाटील, राजकुमार खिलारे, विकास माळी, सचिन साळवी, कृष्णा बोराडे, सुशांत पाटील, घनश्याम ठाकुर, गणेश मोरे, पोना गणेश भोईर, केशव भोये, पोशि अशोक आहेर, विजय आव्हाड, सोपान शेळके, गणेश बडे, नाना चव्हाण, बालाजी गरूड, योगेश आडे, महेश झांजुर्णे, मिलिंद यादव यांच्या पथकाने केली आहे.


Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024